# विश्व मराठी परिषद

**द्वारा विश्व मराठी फाउंडेशन – नोंदणी क्रमांक : (CIN : U93020PN2019NPL181823)**

६२२ जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४

फोन ) ०२०-२५५१३४६० मोबाईल : ७०३०४११५०६

ई-मेल : sampark@vmparishad.org वेबसाईट : www.vishwamarathiparishad.org

# ❖ मानद सभासद नियमावली ❖

- विश्व मराठी परिषद ही संस्था मराठी साहित्य, संस्कृती आणि उद्योजकता या अनुषंगाने भारतात आणि भारताबाहेर विविध देशांमध्ये मराठी बांधवांसाठी कार्यरत आहे. कोट्यावधी मराठी बांधवांसाठी भाषिक, साहित्यिक, सांस्कृतिक उद्योजकीय, व्यावसायिक, स्वयंरोजगारी आणि भावनिक सेतू तयार करून भावी पिढ्यांसाठी समृद्ध वारसा निर्माण करणे हे विश्व मराठी परिषदेचे मुख्य उद्दीष्ट आहे.
- आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन भारतातील आणि भारताबाहेरील विविध देशांमधील मराठी बांधवांना एकत्र जोडणे, त्यांच्यासाठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या माध्यमातून विविध प्रकारचे विचार, साहित्य, कला, सृजनशील निर्मिती, उपक्रम, माहिती, उद्योग संधी, व्यवसाय संधी, स्वयंरोजगार संधी इ. यांची देवाण घेवाण करणे, याविषयी सहाय्य उपलब्ध करणे आणि ऑनलाइन व्यासपीठ सर्वांना उपलब्ध करणे, हे विश्व मराठी परिषदेचे प्रमुख ध्येय आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार होणारे मुक्त व्यासपीठ, प्रत्येकाचा सहभाग आणि आपल्या निर्मितीचा सर्वदूर प्रसार हे विश्व मराठी परिषदेचे वैशिष्ट्य आहे.
- विश्व मराठी परिषदेचे मानद सभासदत्व भारतातील आणि भारताबाहेरील सर्व व्यक्ती आणि संस्था यांना खुले आहे. सभासदत्वाचे वैयक्तिक आणि संस्था असे दोन प्रकार आहेत. तसेच भारतातील आणि भारताबाहेरील असे दोन प्रकार आहेत. सभासदत्व संरचना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- विश्व मराठी परिषदेच्या कार्यासाठी अधिक प्रकारचे सहकार्य करू इच्छिणाऱ्यांसाठी **विशेष सभासदत्व योजना** उपलब्ध आहे. त्याची माहिती संकेतस्थळावर आहे.
- **संस्थेचे मानद सभासदत्व www.vishwamarathiparishad.org या संकेतस्थळावर ऑनलाईन घेता येईल. तसेच संस्थेच्या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष सभासदत्वाचा अर्ज भरूनही घेता येईल.**
- देश विदेशातील प्रत्येकाला सभासद होता येईल. विद्यार्थी, युवक, वाचक, रसिक, श्रोते, लेखक, कवी, साहित्यिक, अनुवादक, प्रकाशक, ग्रंथविक्रेता, कलाकार, गायक, संगीतकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, गीतकार, चित्रकार, शिल्पकार, प्राध्यापक, शिक्षक, व्याख्याते, गृहिणी, नोकरदार, किर्तनकार, छोटे व्यापारी, विक्रेते, डॉक्टर, वकील, सीए, आर्किटेक्ट, इंजिनिअर, सरकारी आणि कॉर्पोरेट अधिकारी समाजसेवक, मराठी भाषा प्रेमी या सर्वांना विश्व मराठी परिषदेचे सदस्य होता येईल.
- याचप्रमाणे वैयक्तिक किंवा भागिदारी व्यापारी संस्था, कॉर्पोरेट कंपनी, उद्योग, ग्रंथालये, चित्रपटगृह चालक, नाट्यगृहचालक, नाट्यसंस्था, सेवा संस्था, सहकारी किंवा विश्वस्त संस्था, शाळा, महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था, देवस्थान, गावोगावची तरूण मंडळे, गणेशोत्सव मंडळे, व्यवस्थापन मंडळी या सर्वांना विश्व मराठी परिषदेचे सभासद होता येईल.
- सभासदत्वाच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

  १) वय वर्षे १८ पूर्ण, युवक, महिला, प्रौढ इ. सर्व बांधव,

  २) भारतीय नागरिक आणि विदेशी नागरिक,

  ३) ज्यांची मातृभाषा मराठी आहे, तसेच ज्यांची मातृभाषा मराठी नाही पण मराठी विषयी प्रेम आहे असे सर्व

  ४) केंद्रिय कार्यकारिणी समितीने वेळोवेळी निर्देशित केलेल्या व्यक्ती आणि संस्था
- **संस्थेचे कार्यक्षेत्र आणि कार्यविस्तार** : संपूर्ण भारत आणि भारताबाहेरील विविध देश – तसेच मराठी बांधव वास्तव्य करून असणारे प्रदेश आणि मराठी भाषा, साहित्य संस्कृती, कला, संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, लोककला, लोकसाहित्य, व्यापार, उद्योग, व्यावसायिक, स्वयंरोजगार, सेवा संस्था, सृजनशील उपक्रम इ. विस्तृत असा कार्यविस्तार आहे. याचबरोबर इतर भारतीय आणि भारताबाहेरील भाषांबरोबरही समविचारी उपक्रम आणि प्रकल्प राबविले जातील.

- **सभासदांबरोबच संपर्क –** सभासदांबरोबरचा सर्व संपर्क, माहितीची देवाण–घेवाण, नियतकालिक पाठवणे, उपक्रमांच्या सूचना, मार्गदर्शन हे फक्त ऑनलाइन आणि ईमेलद्वारे केले जाईल. प्रत्यक्ष पोष्टाने किंवा लिखित, छापील स्वरूपात संपर्क केला जाणार नाही. वैयक्तिक सभासद किंवा संस्था यांच्या नोंदवलेल्या ईमेलद्वारेच संपर्क केला जाईल. तोच अधिकृत संपर्क म्हणून गृहित धरला जाईल.
- **सभासदत्व प्रमाणपत्र –** प्रत्येक सभासदाला अधिकृत प्रमाणपत्र रजिस्टर पोष्टाने / कुरिअरद्वारे पाठवले जाईल. सदस्यत्त्वाची प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन नोंदणी केल्यावर ६० ते ७५ दिवसांमध्ये सभासदांना त्यांनी दिलेल्या पत्त्यावर प्रमाणपत्र मिळेल.
- **संस्थेचे मुख्यालय –** पुणे येथे खालील पत्त्यावर आहे.

  ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, हनुमान चौक, डेक्कन जिमखाना,

  पुणे – ४११००४, महाराष्ट्र, भारत फोन (०२०) २५५१३४६०

  ईमेल – **sampark@vmparishad.org** संकेतस्थळ – **www.vishwamarathioarishad.org**
- **संस्थेची कार्यकारी रचना**
- विश्व मराठी परिषद ही संस्था विश्व मराठी फाउंडेशन या सेक्शन ८ खाली नोंदवलेल्या ना नफा – ना तोटा **(Non-Profit)** प्रकारातील नोंदणीकृत संस्थेचा हा मुख्य उपक्रम आहे. संस्थेचे केंद्रिय कार्यकारीणी मंडळ, सल्लागार मंडळ यांच्याबाबात माहितीसाठी **www.vishwamarathioarishad.org** ला भेट द्यावी.
- संस्थेची उद्दिष्ट्ये, ध्येय धोरणे आणि उपक्रम प्रस्तावित आहेत. संसाधनांच्या उपलब्धतेनुसार त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

  संस्थेची कार्यकारी रचना खालीलप्रमाणे :–

  **अ) केंद्रिय मंडळ –** अ) मार्गदर्शक मंडळ – ११ ब) सल्लागार मंडळ – ११ क) कार्यकारी मंडळ – ५ ड) युवा विभाग प्रमुख – १ इ) महिला विभाग प्रमुख – १

  **ब) प्रत्येक जिल्हा / इतर राज्ये / मोठी शहरे –** कार्यकारी मंडळ – अ) मार्गदर्शक – १ ब) कार्याध्यक्ष – १ क) सचिव – १ ड) सदस्य – २ इ) युवा प्रमुख – १ फ) महिला प्रमुख – १

  **क) विदेश – प्रमुख देश/ प्रमुख शहरे / विभाग –** कार्यकारी मंडळ – अ) मार्गदर्शक – १ ब) कार्याध्यक्ष – १ क) सचिव – १ ड) सदस्य – २ इ) युवा प्रमुख – १ फ) महिला प्रमुख – १

केंद्रिय कार्यकारी मंडळाचा कालावधी पाच वर्षे असेल. इतर सर्व कार्यकारी मंडळांचा कालावधी ३ वर्षाचा असेल. सहमतीने पुढील कालावधीसाठी तेच कार्यकारी मंडळ किंवा नविन सहमतीने निवडलेले कार्यकारी मंडळ कार्य करू शकेल. सहमती न झाल्यास निवडणूक घेतली जाईल.

- सभासदांना विविध प्रकाराची माहिती, डिजिटल कंटेंट, प्री रेकॉर्डेड कार्यशाळा, लेखक आणि प्रकाशकांची माहिती, भाषा, साहित्य, संस्कृती विषयक उपयुक्त माहिती, उद्योग संधी, व्यावसायिक संकल्पना, उद्योजकीय संकल्पना, कलाविषयक, सांस्कृतिक उपक्रम लॉग इन करून उपलब्ध असतील.
- सभासदांना त्यांचे साहित्य, उपक्रम, संमेलन इ. विविध उपक्रमांची माहिती विश्व मराठी परिषदेच्या ऑनलाईन व्यासपीठामार्फत अन्य सभासदांपर्यंत पोहोचवता येईल. त्यासाठी संस्थेचे नियामक मंडळ त्याची तपासणी करेल आणि त्यानंतर ते ऑनलाइन माध्यमातून पाठविण्यात येईल. याबाबत संस्थेच्या नियामक मंडळाचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.
- संस्थेच्या नियमावलीमध्ये गरजेनुसार वेळोवेळी कार्यामध्ये बदल करणे, कार्याची नवीन दिशा ठरविणे, त्यानुसार कार्यविस्तार आणि कार्य संकोच करणे असे अधिकार केंद्रिय कार्यकारी मंडळाकडे राखीव आहेत. संस्थेचे सर्व प्रकारचे कार्य आणि उपक्रम यांच्यावर अंतिम निर्णय केंद्रीय समितीच्या कार्यकारी मंडळाचा राहील.
- संस्थेचे हितसंबंध, प्रतिष्ठा आणि उद्दिष्टांविरोधी आणि प्रतिकूल वर्तन करणाऱ्या सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार केंद्रिय कार्यकारी मंडळाला आहे. सभासदत्वाचा राजीनामा, मृत्यु, फौजदारी गुन्ह्याबद्दल शिक्षा झाल्यास सभासदत्व रद्द होईल.
- सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र ही राहील.